# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. १५/०४/२०१७

## *आगीत जळून खाक झालेल्या कुटुंबाला उपपोस्टे व्यंकटापूर पोलीसांनी दिला मदतीचा हात*

उपविभाग अहेरी हद्दीतील उपपोलीस स्टेशन व्यंकटापूर अंतर्गत असलेल्या मौजा आवलमारी येथील रहिवासी महिला नामे श्रीमती पद्‌मा नरेश आत्राम यांचे घर दिनांक १३/०४/२०१७ रोजीचे दुपारी १४.३० वा. आग लागून पुर्ण पणे जळून खाक झाले. सदर आगीमध्ये घरामध्ये असलेले धान्य, कपडे, भांडी, तसेच सदर महिलेचे पती हे एक वर्षापुर्वी कॅन्सरने मरण पावल्यामुळे त्यांना मिळालेली २०,०००/- रू. आर्थिक मदत हे सुध्दा सदर आगीमध्ये जळून खाक झालेले आहे. व सदर महिलेला २ मुली व २ लहान मुले आहेत. घटनास्थळी उपपोस्टेचे प्रभारी अधिकारी श्री. वाय. एस. पाटील सा., पोउपनि श्री. ए.एस. हिवरकर सा., पोउपनि एस.सी. गोसावी सा. व पोलीस पार्टीसोबत घटनास्थळी भेट देवून पहाणी केली असता, एकंदरीत अंदाजे ८०,०००/- रू. चे नुकसान झालेले आहे.

उपपोलीस स्टेशन व्यंकटापूर पोलीस दलातर्फे पिढीत कुटुंबियास संसार उपयोगी सर्व साहित्य, कपडे, भांडी, २ क्विंटल धान्य तसेच ५,०००/- रू. रोख रक्कम मदत म्हणून देण्यात आली.

सदरवेळी उपपोस्टेचे प्रभारी अधिकारी श्री. वाय.एस. पाटील सा., पोउपनि श्री. ए.एस. हिवरकर सा., पोउपनि एस.सी. गोसावी सा. व पोलीस कर्मचारी तसेच आय.आर.बी. चे पोउपनि सर्वे सा. व कर्मचारी हे उपस्थित होते.

